# आदिवासींचे ऋण आहे आम्हा सर्वांवर, त्याची फेड करीत आहेत बंग दांपत्य

## क्षितिजांच्या पल्याड




संस्थापक तथा अध्यक्ष
**अर्घ्यम**
**रोहिणी निलेकणी**


या नव्या दशकाच्या सुरुवातीस मला एका प्राचीन भागात जाण्याची संधी मिळाली हे माझे सुदैवच म्हणावे. हा सारा टापू शतकानुशतकांच्या त्रस्ततेतून आता कुठे बाहेर येत आहे. विदर्भातील गडचिरोली, भारतातील सर्वाधिक मागास आदिवासी जिल्ह्यापैकी एक. येथील गोंड आदिवासींच्या वन क्षेत्रात देशातील ८ कोटी आदिवासींप्रमाणेच गोंड समाजाचा सामना त्यांच्या अस्तित्वाशी निगडित प्रश्नांशी सुरू असतो. आधुनिक अतिक्रमकारी जगाला त्यांनी किती स्वीकारावे? ते आपली पुरातन सांस्कृतिक प्रथा कशी जिवंत ठेवू शकतील, ज्याची नाळ जंगलाशी जोडली गेली आहे? आपले पारंपरिक ज्ञान भावी पिढीसाठी कसे सुरक्षित ठेवू शकतील, ज्यांच्या महत्त्वाकांक्षा वेगाने बदलत आहेत?

साधारणपणे ३४ वर्षांपासून या समाजासोबत जगताना आणि काम करताना डॉ. अभय आणि राणी बंग यांनी हे सारे प्रश्न जवळून अनुभवले आहेत. म. गांधी आणि विनोबा भावेंचा त्यांच्यावर मोठा प्रभाव आहे. अमेरिकेतून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेल्या या दोघांनी आरोग्यासारख्या पायाभूत गरजेवर अधिक लक्ष केंद्रित केले. वर्षानुवर्षांपासून जे पाहिले, ऐकले आणि वाचले त्याच्या आधारावर आरोग्य चिकित्सेचे असे काही मॉडेल तयार केले, जे या समाजाच्या गरजेसाठी उपयुक्त ठरणारे आहेत. अर्थात, त्याचे निष्कर्षदेखील चांगले आले आहेत. बालमृत्यू दर घटला तसेच अन्य आजारांचे ओझे हलके झाले. त्यांनी बनवलेल्या उपचार पद्धतीचे मॉडेल केवळ देशभरातच नव्हे, तर आफ्रिकेतदेखील उपयुक्त ठरले आहे. 'सर्च' हे त्यांच्या संस्थेचे नाव आहे. अर्थात, सोसायटी फॉर एज्युकेशन, ॲक्शन ॲंड रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ. सुमारे ५५ एकरांच्या या सुंदर कॅम्पसचे नाव आहे 'शोधग्राम.' निरनिराळ्या क्षेत्रातील युवा व्यावसायिकांना येथे राहण्याची, काम करण्याची, समाजाच्या असाध्य अडचणी सोडवण्यासाठी संशोधन आणि प्रयोग करण्याची संधी तर येथे मिळतेच, शिवाय प्रोत्साहनदेखील मिळते. येथील टीमची समर्पणवृत्ती आणि कटिबद्धता ही अनुकरणीय, प्रेरक अशी आहे. मी येथे आले तेव्हा शस्त्रक्रिया शिबिर सुरू होते. या शिबिरात श्रमदानासाठी दूरवरून डॉक्टर आले होते. त्यांनी सांगितले की, हे श्रमदान आम्हास स्फूर्तिदायक आणि आनंददायक ठरले. त्यासाठी आम्ही पुन्हा पुन्हा येथे येऊ. तसेच येथे उत्तम दर्जाची वैद्यकीय सुविधा तर मिळतेच, शिवाय प्रेम-औदार्याची अनुभूती मिळते. त्यामुळे येथे येत असतो, असे रुग्णांनी सांगितले.

उल्लेखनीय म्हणजे बंग दांपत्याने अंधश्रद्धाळू विचारसरणीच्या प्रवाहात आपला दृष्टिकोन कठोर होऊ दिला नाही या बाबीचा माझ्यावर अधिक प्रभाव पडला. ज्या काळात ध्रुवीकरणाचे प्रयोग मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत त्या स्थितीतही मुक्त वैचारिक संघटन मिळणे हे अतिशय सुखद ठरावे. 'सर्च'ने आपली वैज्ञानिक जिज्ञासा आणि पुरावे (प्रमाण) आधारित दृष्टिकोनासोबतच मानवतावादी धारणा कायम राखली आहे. डॉ. राणी आपल्या मनाचा आवाज अधिक ऐकतात आणि डॉ. अभय बंग विवेक अधिक बाळगतात. जेव्हा या दोघांकडून चूक होते त्या वेळी ती स्वीकारण्यास ते घाबरत नाहीत. डॉ. अभय बंग म्हणाले, एक संशोधक म्हणून मला सिकल सेलच्या संदर्भात संशोधन करण्याची इच्छा होती, मात्र नंतर असे लक्षात आले की, आदिवासी समुदायाची ही मूलभूत समस्या नाही, तर न्यूमोनिया, बालमृत्यू, व्यसनाधीनता यावर अधिक काम करण्याची आहे. ज्या संशोधनाची सुरुवात आदिवासींसाठी झाली ती आता त्यांच्या जीवनाचा भाग बनून राहिली. येथे प्रशिक्षण घेतलेली अंजनाबाई अभिमानाने म्हणाली, गेल्या अनेक वर्षांत माझ्या पाहण्यात एकही बालमृत्यू आलेला नाही. तिने एका नवजात बाळाच्या घरी मला नेले. किरकोळ बदलांमुळे हे शक्य झाले. नवजात माता पूर्वी आपल्या बाळाला कपडे घालत नसत त्यामुळे हायपोथर्मियाचा धोका अधिक असायचा. आता कुटुंबीय आणि आरोग्यसेवक नवजात बाळांची नियमित देखरेख करतात. 'मुक्तिपथ' या सरकारी योजनेच्या माध्यमातून दारू आणि तंबाखूवरील खर्चदेखील कमी करण्यात आले आहेत. काही वर्षांपूर्वी गडचिरोली जिल्हा नक्षलवाद्यांचा अड्डा बनला होता. अजूनही या परिसरात काही बंडखोर दडलेले आहेत. बंग दांपत्य गोंड आदिवासींच्या उत्थान आणि समृद्धीसाठी नि:स्वार्थरीत्या कटिबद्ध आहेत. ज्या गडचिरोलीत कधी काळी सुरक्षित पोहोचणे शक्य नव्हते तो गडचिरोली जिल्हा हळूहळू देशाच्या मुख्य प्रवाहाशी जोडला जात आहे. आता कॉलेज, दुकान आणि रुग्णालये आहेत. चांगले रस्ते, दळणवळणाची उत्तम संपर्क माध्यमे आहेत. परंतु काय, आदिवासी आमच्याप्रमाणे आधुनिक बनतील? त्यांच्याकडून काही शिकण्याची सुविधा आपल्याकडे असेल? या प्रश्नाचे उत्तर काही मिळत नाही. गडचिरोलीतून परतताना मात्र इथली शुद्ध हवा भरपूर प्रमाणात घेऊनच निघाले. तेंदू, साग आणि मोहाच्या झाडांची तसेच साऱ्या गोंड आदिवासी समाजाची मी आभारी आहे, जे या जंगलाची सेवा करीत असतात. या आदिवासी समुदायाचे या देशावर खूप मोठे ऋण आहे आणि डॉ. बंग दांपत्य त्याचा एक छोटासा वाटा चुकता करण्याचा प्रयत्न अनेक वर्षांपासून करीत आहेत.